रे. क. क्रमांक २३७/२०१४
CNR No. MHKO070013902014

निशाणी ३७ वरील आदेश.

| | | |
|---|---|---|
| कलगोंडा बाळगोंडा पाटील | – | वादी. |
| वि. | | |
| प्रमोद श्रीधर खंजिरे व इतर . | – | प्रतिवादी. |

१. प्रस्तुत दावा वादीने करारपत्राप्रमाणे खरेदीखत होवून मिळणेसाठी दाखल केलेले असून प्रस्तुतचा अर्ज दाव्यामध्ये दुरुस्ती करणेसाठी केलेला आहे.

२. अर्जदाराचे असे कथन आहे की, दावा मिळकतीच्या परिच्छेद क्र. ३ मधील खालून ओळ क्र. ३ मध्ये मध्ये नजरचुकीने दिनांक '०१/०९/१९८९' ऐवजी दिनांक '१९/०७/१९९०' असे नमुद झाले आहे. प्रस्तुतची दुरुस्ती ही किरकोळ स्वरूपाची असून त्यामुळे दाव्याच्या स्वरुपामध्ये कोणताही बदल होणार नाही, तसेच प्रतिवादीचे देखील कोणतेही नुकसान होणार नाही. सबब त्याने प्रस्तावीत दुरुस्तीस परवानगी मिळणे विषयी विनंती केली आहे.

३. प्रतिवादी यांनी म्हणणे देवून अर्जास विरोध केला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार वादीच्या प्रस्तावित दुरुस्तीमुळे दाव्याच्या स्वरुपात बदल होणार आहे. वादीने सदरचा अर्ज विलंबाने दाखल केलेला असून त्याबाबत कोणतेही सबळ कारण अर्जामध्ये दिलेले नाही. म्हणून त्याने अर्ज नामंजूर करणेची विनंती केली आहे.

४. उभय पक्षकारांतर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

५. अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा करारपपत्राप्रमाणे खरेदीपत्र होवून मिळण्याकरिता दाखल केलेला असून वादीने दावा परिच्छेद क्र. ३ मधील खालून ओळ क्र. ३ मध्ये दिनांक '०१/०९/१९८९' ऐवजी दिनांक '१९/०७/१९९०' असे नमूद केल्याचे कथन निशाणी क्र. ३/७ कडील खरेदीपत्रावरूना खरे असल्याचे दिसून येते. ती तारीख खरेदीपत्र अ. क्र. १८६९ ची

असल्याचे वादपत्राचे संपूर्ण अवलोकनावरून स्पष्ट होते. त्यामुळे दाव्याचा गुणदोषावर अंतिम निकाल होण्याच्या दृष्टीने करारपत्राची योग्य तारीख वादपत्रामध्ये नमूद असणे आवश्यक आहे. सदरची चुक नजरचुकीने झाल्याबाबतचे वादीचे कथन समाधानकारक वाटते. त्यामुळे प्रस्तावित दुरुस्ती मंजूर करणेस पात्र आहे. परंतु प्रतिवादीच्या कथनाप्रमाणे वादी अशी दुरुस्ती यापूर्वीही करु शकला असता. दावा सन २०१४ मध्ये दाखल केलेला असून चौकशी चालू झालेली आहे. तथापी, वादीने प्रस्तुतचा अर्ज जवळपास चार वर्षांनी दाखल केला आहे. किंबहुणा अशी दुरुस्ती तो यापूर्वीही करु शकला असता, परंतु त्याने तसे केलेले नाही. त्यामुळे त्याबाबत कॉस्टस् बसविणे योग्य वाटते.

६. वरील सर्व बाबींचा विचार करता खालील प्रमाणे आदेश करणेत येतो.

**आदेश**

**अ.** प्रतिवादी यांना रक्कम रुपये ५००/- (रुपये पाचशे फक्त) कॉस्ट देण्याच्या अटीवर अर्ज मंजूर करणेत येतो.

**ब.** अर्जदारने प्रस्तुतची दुरुस्ती मुदतीत करणेची आहे.

सही/-

दिनांकः २३/०१/२०१९ सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, जयसिंगपूर.